# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

---

**दिनांक १५.०५.२०२६ शुक्रवार**

**मा. न्यायालयातुन आरोपींना सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १५.०५.२०२६ रोजी मा. ७ वे अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. अनिलकुमार के. शर्मा यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. स्पेशल केस युएपीए केस क्र. ४८० व ४८२/२०२३ मधील, पोलीस ठाणे धंतोली येथील अप. क्र. १४/२०२३ कलम ३८५,३८७,५०६(२),५०७ भादंवि कलमवाढ १०,१३,१८,२० युएपीए ॲक्ट १९६७ आणि ७८/२०२३ कलम ३८५,३८७,५०६(२),५०७ भादंवि कलमवाढ १०,१३,१८,२० युएपीए ॲक्ट १९६७ या दोन्ही गुन्ह्यातील आरोपी क्र. १) जयेश उर्फ जयेशकांत उर्फ शाकीर शशीकांत पुजारी, वय ३७ वर्ष, रा. पयाथिरुरित्तील वडाको मेडामुक्कु अल्लपुरा, मंगलुरु, कनार्टक, ह.मु. हिंडलगा केंद्रीय कारागृह, बेळगाव, कनार्टक २) अफसर पाशा उर्फ बशीरुद्दीन वल्द नुर अहमद, वय ४५ वर्ष, रा. किश्तीनगर, टिकूड रोड, चिंतामणी चिंकावालापुरा, कनार्टक ह.मु. हिंडलगा केंद्रीय कारागृह, बेळगाव, कनार्टक याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, दोन्ही आरोपींना १) कलम ३८५,३४ भादंवि कायद्यान्वये ०२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास १० महिने अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा २) कलम ३८७,३४ भादंवि कायद्यान्वये ०५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्ष अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ३) कलम ५०६(२),३४ भादंवि कायद्यान्वये ०५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्ष अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ४) कलम ५०७,३४ भादंवि कायद्यान्वये ०२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास १० महिने अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ५) कलम १० युएपीए कायद्यान्वये ०२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास १० महिने अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ६) कलम १३(१) युएपीए कायद्यान्वये ०५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्ष अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ७) कलम १८ युएपीए कायद्यान्वये ०५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्ष अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. दोन्ही आरोपींची युएपीए कायद्याचे कलम २० मधून निर्दोष मुक्तता करण्यात आली.

दिनांक १४.०१.२०२३ चे ११.२९ वा ते १२.३० वा. चे दरम्यान, वर नमुद दोन्ही आरोपी हिंडलगा केंद्रीय कारागृह, बेळगाव, कनार्टक येथे शिक्षा भोगत असतांना, त्यांनी विविध मोबाईल क्रमांकाचा वापर करुन मा. केंद्रीय मंत्री, भारत सरकार श्री. नितीनजी गडकरी यांचे पोलीस ठाणे धंतोली हद्दीतील जनसंपर्क कार्यालयाचे दुरध्वनी क्रमांकावर कॉल करुन, धमकी दिली. तसेच, आरोपीतांनी १०० कोटी व १० कोटी रुपये खंडणीची मागणी करुन रक्कम न दिल्यास बॉम्बस्फोट घडवून आणून मा. केंद्रीय मंत्री, भारत सरकार यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी जनसंपर्क कार्यालयातील सुरक्षा रक्षक फिर्यादी जितेंद्र राधेश्याम

शर्मा वय ५२ वर्ष, रा. ०४, श्रीपुर्णा ले–आऊट, साई नगर, गिट्टीखदान, दाभा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे दोन्ही आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपी क्र. १ जयेश यास दिनांक २८.०३.२०२३ रोजी तर, आरोपी क्र. २ अफसर पाशा यास दिनांक १९.०७.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी सहायक पोलीस आयुक्त श्री. अभिजीत पाटील यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. सौ. वेदीका पाटील यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री हेमंत झा यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. सुषमा बेले, पोहवा अचल हारगुडे यांनी काम पाहिले.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे सिताबर्डी :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादीचे चुलतभाऊ नामे श्यामलाल मेढाई वर्मा, वय ७० वर्ष, रा. प्रतापगढ, उत्तरप्रदेश, ह.मु. काछीपुरा, रामदासपेठ, पृथ्वीराज कश्यप यांचे घरी किरायाने, सिताबर्डी, नागपूर हे खाजगी बंगल्यात जावुन बागकाम करायचे. दिनांक १५.०५.२०२६ चे ०५.०० वा. ते ०५.४५ वा. चे दरम्यान, फिर्यादीचे भाऊ त्यांचे सायकलने पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, श्रीमद रामचंद्र चौक, वेस्ट कार्ट बिल्डींग समोरील रोडने, रामदासपेठ सिताबर्डी येथून जात असता, कोणीतरी अज्ञात कार चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे चुलतभावाचे सायकलला धडक देवुन पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादीचे चुलत भाऊ गंभीर जखमी झाले. त्यांना फिर्यादी व पोलीसांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी रामसुख भगेलूराम वर्मा वय ६३ वर्षे रा. प्लॉट क्र. १०२, समता नगर, नारी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे मसपोनि. जोत्स्ना भावसार ८२७५७०५५३७ यांनी अज्ञात कार चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १८४,१३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे ईमामवाडा</u> :–** दिनांक १५.०५.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत, कार्तिक पानटपरीजवळ, राजाबाक्षा हनुमान मंदीर, गाडगेबाबा धर्मशाळेच्या कमानीजवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० वर्ष, ज्यांनी अंगात निळे चौकडीचे शर्ट व काळा जिन्स पॅन्ट घातलेला, डोक्याचे केस काळे–पाढरे, दाढी बारीक व पांढरी, उंची ५ फुट ५ इंच अशा वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी बबन पुंडलीक जयपुरकर, वय ६० वर्षे रा. शिवणकर नगर, खरबी रोड, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे पोउपनि. मारोती पोवार ९१४६९९३६२६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे अजनी</u> :–** दिलीप माणिकराव पारधी, वय ५५ वर्षे व त्यांची पत्नी सौ. कमल दिलीप पारधी, वय ५२ वर्ष, दोघे रा. प्लॉट नं. ३४, अंबा शिवशक्ती नगर, अजनी, नागपूर हे दोघे पतीपत्नी दिनांक ०३.०५.

२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन दिलीप</u>** रंग– गोरा, चेहरा– गोल, बांधा–मध्यम, उंची– ५ फुट ५ इंच, डोळे–काळे, केस– काळे, अंगात– निळया रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. **<u>वर्णन सौ. कमल</u>** रंग– गोरा, चेहरा–लांबट, बांधा–मजबूत, उंची– ५ फुट १ इंच, डोळे–काळे, केस– काळे व लांब, अंगात– पांढरे रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे सक्करदरा</u> :–** विजय रमेश कळंबे, वय ५२ वर्षे, रा. प्लॉट नं. २६, नवीन बिडीपेठ, सक्करदरा, नागपूर हे दिनांक ०७.०५.२०२६ चे ११.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट २ इंच, केस– काळे व पातळ, अंगात– गुलाबी रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**<u>३) पोलीस ठाणे पारडी</u> :–** चमार खट्टू सिफ, वय २० वर्षे, रा. पोलीस ठाणे रामपूर, छिंदवाडा (मध्यप्रदेश), ह.मु. उमिया वसाहत, भंडारा रोड, पारडी, नागपूर हे दिनांक ०५.०५.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– साधारण, उंची– ५ फुट ४ इंच, केस– काळे, डोळे–घारे, अंगात– काळया रंगाचे चेकचे शर्ट व निळ्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेली असून पायात काळया रंगाची रबरची चप्पल घातली आहे. भाषा– हिंदी/छत्तीसगढी बोलतात.



दिलीप सौ. कमल



विजय



चमार खट्टू सिफ

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपुर. | ३०३२२६ /२००७ | कलम ३८०, ४५४, ५११, ३४ भा.दं.वि. | अशोक बन्सीलाल चव्हाण, रा. प्लॉट नं. ११९, वाल्मीक नगर गोकूलपेठ, नागपूर. | १८.०६.२०२६ |
| २ | मा. १६वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम वर्ग न्याय | ३०२३३० /२००९ | कलम १४३, १४५,१४७, ३४१,४३५, | १) विजय हरीचंद्र टालोकर, वय ३२ वर्ष, रा. झाशी रानी चौक, पुनापूर रोड, प्लॉट क्र. ६६६, | २०.०५.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दंडाधिकारी, नागपूर | | ३०८,३४ भादंवि | पारडी, नागपूर.<br>२) शेख कलीम उर्फ कलीम शेख बब्बुभाई टांगेवाले वय २१ वर्ष रा. भांडेवाडी, पारडी, दीपनकर शाळेजवळ, नागपूर | |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उपनिरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**